**वाचा**:

१. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सुचना केलेल्या उपाय योजना पत्र क्र. एमपीसीबी/जेडी/एपीसी/बी-५३७० दि.२९/०९/२०११
२. अर्जदार यांचा अर्ज दिनांक --------------------------------
३. ग्रामपंचायत सभा दि. ------------------------ ठराव क्र. -------
४. ----------------------------------------------------

कार्यालय ग्रा.पं.----------------------

ता.------------------- जि.-------------

दिनांक :    /    /२०

# ना हरकत प्रमाणपत्र

प्रमाणपत्र देण्यात येते की, अर्जदार श्री/सौ. -----------------------------------------------------------

रा. -------------------------------- ता.---------------------------- जि. ------------------------------------

यांना मौजे -------------------------------------- मिळकत क्र.----------------------या ठिकाणी खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून कुक्कुटपालन व्यवसाय करण्यास ग्रामपंचायत कार्यालयाची काहीही हरकत नाही.

**अटी व शर्ती :**

१. सदरील व्यवसायासाठी शासकीय नियमानुसार आवश्यक असणा-या संबधित विभागांची परवानगी घेणे बंधनकारक राहील.
२. पोल्ट्री फार्ममुळे पिण्याच्या पाण्याचे स्रोत, अगर नदी नाला प्रवाह प्रदूषित होणार नाही, याची खबरदारी घेण्यात यावी.
३. कुक्कुट शेडची दिशा पूर्व – पश्चिम असावी म्हणजे सुर्य प्रकाश सरळ आत येणार नाही. शेडची जमिनीपासूनची उंची ३ फुट ठेवण्यात यावी व पक्षी गृहाचे तळ सिमेंट कॉक्रेंटचे असले पाहिजे.
४. पोल्ट्रीच्या अवती भवती वृक्ष लागवड करावी. पोल्ट्री फार्मला जाळीचे कुंपण करण्यात यावे.
५. पोल्ट्रीत जमिनीचे कॉक्रिटीकरण / फरशी ,नाली, पक्के गटार, सांडपाणी सेफटीक टाकी यंत्रणा, सोक पीट व कंपोस्ट खडडे तयार करण्यात यावे. पोल्ट्रीचे नियमित निर्जंतुकीकरण करावे. पक्षी कटाई नंतर तयार होणा-या कच-याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावावी.
६. जागेची निवड करताना शेड लोकवस्तीपासून तसेच हायवे पासून दूर असावे. कारण आवाज, गडबड गोंधळ इ. मुळे पक्षांवर ताण येतो.
७. ज्या पोल्ट्रीत कत्तलखाना असेल असे पोल्ट्री फार्म मानवी वस्तीपासून दूरवर असावेत.
८. कुक्कुट पालकाने पक्षासाठी पुरेपूर हवा खेळती राहील याकडे लक्ष दिले पाहिजे. वायु प्रदूषण होणार नाही याकडे लक्ष दयावे.

९. कुक्कुट पालन अनुक्रमे अंडी उबवणे व पिल्ले वाढवणे यामुळे प्रदुषण कमी प्रमाणात होते परंतु त्यांचे शेड निर्जंतुकीकरण पशुसंवर्धन विभागाच्या सुचनांनुसार करणे आवश्यक आहे.

१०.जे पक्षी मटनासाठी वापरले जातात त्यांना रेड कक्षात मोजले जाते. त्यांचे कटाई कक्ष मानवी वस्ती व पाण्याच्या साठयापासून सुरक्षित अंतरावर असले पाहिजेत. शक्यतो व्यवस्थित रस्ता असावा व जमीन खडकाळ व उतरणीवर असावी म्हणजे पावसाचे पाणी साचणार नाही.

११.कुक्कुट पालकाने पक्षीगृहाची नियमित निर्जंतुकीकरण फवारणी करून साफसफाई ठेवली पाहिजे, जेणे करून कुठल्याही प्रकारचे प्रदूषण होणार नाही.

१२. कुक्कुट पालकाने कुक्कुट पक्षाची विष्ठा, पंखे व त्यांचे इतर प्रकारचे उपयोगात न येणारे अवयवांची वैज्ञानिक पद्धतीने विल्हेवाट लावली पाहिजे.

१३. कुक्कुट पालकाने पक्षी खतासाठी कॉक्रेंटचे खडडे तयार करून त्यावर मातीयुक्त थर देण्यात यावा, जेणेकरून त्याचा शेतीसाठी खत म्हणून वापर करण्यात येईल.

१४. कुक्कुट पक्षाची विष्ठा टाकण्याचे कॉक्रेंट टाकी नियमित स्वच्छ करून घ्यावेत व ते मानवी वस्तीपासून सुरक्षित अंतरावर असावेत, जेणेकरून हवेद्वारे त्यांची दुर्गंधी येणार नाही.

१५. कुक्कुट पक्षाची विष्ठा २४ तासाच्या आत उचलली गेली पाहिजे, जेणेकरून त्यावर जंतु वाढणार नाहीत.

१६. कुक्कुट पालकांने आपल्या पक्षाचे सर्व लसीकरण, निर्जंतुकीकरण इत्यादीची नोंद ठेवली पाहिजे आणि मरतुक झालेले पक्षी खोल खडडयात पुरले पाहिजेत, जेणेकरून पाळीव कुत्रे किंवा पक्षी तिथे येणार नाहीत व त्यामुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण होणार नाही.

१७.कुक्कुट पक्षांची मलमूत्र वाहण्याच्या गटार वेगळे बांधण्यात यावेत, जेणेकरून पावसाच्या पाण्यात ते मिसळणार नाहीत.

१८.योग्य प्रकारची रासायनिक स्प्रे नियमित फवारण्यात यावेत, जेणेकरून दुर्गंधी येणार नाही. तसेच शेड मध्ये माश्या, उंदीर, घूस, मांजर, चिमण्या व कावळे इ. येणार नाहीत याची काळजी घ्यावी. नवीन पक्षीशेड बांधतांना नजिकच्या पशुधन विकास अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.

१९.पक्षांची मरतुक होत असेल तर ताबडतोब जवळच्या पशुवैदयकीय अधिका-यास सुचित करणे आवश्यक आहे. जेणेकरून भविष्यात आरोग्याच्या दृष्टीने काळजी घेणे शक्य होईल.

२०.-----------------------------------------------------------------------------------------------

ग्रामपंचायतने नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तीचे पालन होत नाही असे आढळून आल्यास सदर ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्याचे अधिकार ग्रामपंचायतीला राहतील.
करिता वरील अटी-शर्तीच्या अधिन राहून ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

सरपंच ग्रामसेवक/ ग्रा.वि.अ.

ग्रामपंचायत --------------------- ग्रामपंचायत -------------------

www.majhigrampanchayat.com